**मसुदा**
**क्र. /२०१७–१८**

**गोपनीय**
**व्यवस्थापन परिषद**

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा ***सोमवार, दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता सर फिरोजशहा मेहता,*** **व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२** येथे आयोजित करण्यात आली. सभेमध्ये खालील सदस्य उपस्थित होते :–

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरू) | – अध्यक्ष |
| २. | डॉ. विष्णू मगरे (प्र–कुलगुरू) | – सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | – सदस्य |
| ४. | डॉ. मुरलीधर कु–हाडे | – सदस्य |
| ५. | डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा | – सदस्य |
| ६. | प्रा. डॉ.गौतम गवळी | – सदस्य |
| ७. | डॉ. दिनेश कांबळे (कुलसचिव) | – सदस्य सचिव |
| ८. | डॉ. कविता लघाटे (प्र. वित्त व लेखा अधिकारी) | – निमंत्रित |

## ➢ स्वागत :–

कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

तसेच, श्री. विजय तायडे (वित्त व लेखा अधिकारी) दिनांक २८ फेबुवारी, २०१८ रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे (डॉ.) श्रीमती कविता लघाटे यांना दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी वित्त व लेखा अधिकारी पदाचा पदभार दिला व त्यांचे व्यवस्थापन परिषदेत पुस्तक देवून हार्दिक स्वागत करण्यात आले.

## ➢ श्रध्दांजली:–

### श्री. जयंत ससाणे

शिर्डीच्या साईबाबा संस्थानाचे माजी अध्यक्ष, माजी आमदार व कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री. जयंत ससाणे यांचे दीर्घ आजाराने दिनांक १९ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६० वर्षाचे होते.

### श्रीमती कमल देसाई

स्वातंत्र्यसेनानी, ज्येष्ठ समाजवादी नेत्या व माजी आमदार श्रीमती कमल देसाई यांचे वृध्दापकाळाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ९८ वर्षांच्या होत्या.

**डॉ. बी.के.गोयल**

प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ व माजी अधिसभा सदस्य डॉ. बी.के.गोयल यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले.

**पं. अरविंद मुळगावकर**

प्रसिध्द तबलावादक पं. अरविंद मुळगावकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८० वर्षाचे होते.

**श्रीमती श्रीदेवी कपूर**

सुप्रसिध्द अभिनेत्री श्रीमती श्रीदेवी कपूर यांचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०१८ रोजी आकस्मात निधन झाले. मृत्युसमयी त्या ५४ वर्षांच्या होत्या.

निधनाबद्दल शोक व्यक्त करुन सर्व दिवंगतांना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**बाब क्र.१** **दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

**ठराव** असा ठराव करण्यात आला की, दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त खालील दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले.

**दुरुस्ती** १ — बाब क्र. १ च्या ठरावामध्ये खालील प्रमाणे दुस—या परिच्छेदाचा समावेश करण्यात आला :—

**“Council expressed its displeasure for the way M/s. MeritTrac Service Pvt. Ltd. (OSM Service Provider) abruptly stopped the work and hampered the examination work, which ~~in~~ incorrect manner of working for which the Council has ~~shown~~ ~~their~~ dissent~~. Therefore, it was decided to issue warning letter~~ to M/s. MeritTrac Service Pvt. Ltd”.**

**बाब क्र.२** **दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

**ठराव** असा ठराव करण्यात आला की, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त खालील दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले.

**दुरुस्ती** १—बाब क्र.३, पान क्र.४ मध्ये खालील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा.

विद्यापीठाने सूचना दिल्या असताना विद्यापीठाच्या सूचना न पाळता कोणत्या विभागाने शिक्षकेतर कर्मचा–यांची नेमणूक केली, याची सविस्तर माहिती सादर करण्यात यावी.

**दुरुस्ती २ — चर्चेच्या अनुषंगाने आलेले विषय — पान क्र. ५ वर खालील** परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा.

**"चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित करण्यात आला.**

२) विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विविध मागण्यासाठी परिक्षा भवनासमोर उपोषण सुरु केले होते. त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे प्र–कुलगुरु, डॉ. व्ही.एन. मगरे व व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. दिपककुमार मुकादम यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी आंदोलनकर्ते विद्यार्थी यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली व त्यांच्या मागण्यांच्या पुर्ततेबाबत उचित कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले".

ाब क्र.३ **दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ चे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या सभेत खालील दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले.

**दुरुस्ती १** — बाब क्र. ११ व पान क्र. ५.

असा ठराव करण्यात आला की, नॅशनल सेंटर फॉर नॅनोसायन्सेस ॲन्ड नॅनोटेक्नॉलॉजी येथील शिक्षक सर्वश्री डॉ. अतुल चासकर, डॉ. सुहास जेजुरीकर व डॉ. प्रविण वाळके यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असल्याने सदर शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी स्थापन झालेल्या समिती मध्ये डॉ. गौतम गवळी यांचा 'सदस्य म्हणून ~~समावेश~~ करण्यात यावा. उल्लेख करावयाचा राहून गेल्याने त्यांच्या नावाचा उल्लेख

**बाब क्र.४ मुंबई विद्यापीठाचे सन २०१७–१८ च्या सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१८–२०१९ च्या अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या स्विकृती व अधिसभेच्या विचारार्थसाठी सादर करण्याबाबत.**

ठराव सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने दुरूस्तीसह सुचविलेल्या

शिफारशींनुसार विद्यापीठाचा सन २०१७–२०१८ चा सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१८–२०१९ चा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात यावा व सदर अर्थसंकल्पिय अंदाज अधिसभेने मान्य करावा, अशी शिफारस करण्यात यावी. (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ [जी] प्रमाणे)

पुढे असाही ठराव करण्यात आला की, डॉ. रश्मी ओझा, अधिष्ठाता आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांना २०१७–१८ च्या सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१८–२०१९ च्या अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेमध्ये सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले.

**बाब क्र.५** **Annual Accounts for the year 2012-13, Income & Expenditure, Balance Sheet for the year ended 31st March, 2013 and Audit Report submitted by M/s. Gokhale & Sathe (C.A.) Statutory Auditor along with remarks of Finance & Accounts Committee for consideration.** F

**ठराव** After detailed discussion, it was resolved that the Annual Accounts for the year 2012-13, Income & Expenditure, Balance Sheet for the year ended 31st March, 2013 and Audit Report submitted by M/s. Gokhale & Sathe (C.A.) Statutory Auditor, be approved and be recommended to the Senate for its acceptance & approval along with remarks of the Management Council.

It was further resolved that the Audit Report submitted by M/s. Gokhale & Sathe (C.A.) Statutory Auditor, be placed before the next meeting of the Finance & Accounts Committee along with the compliance of the office.

It was also resolved that Dr. Rashmi Oza, Dean, Faculty of Inter-Disciplinary Studies be nominated to present the Annual Accounts and Balance Sheet as per above resolution.

**बाब क्र.६** **डॉ. जॉर्ज जोस यांना विद्यापीठ फंडातून देण्यात आलेले २ वर्षांचे वेतन व त्यानंतर मा.उच्च न्यायालयाने डॉ. जोस यांच्या विरूध्द दिलेला निकाल विचारात घेवून त्यांना विद्यापीठ फंडातून अदा करण्यात आलेल्या वेतनाबद्दल धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत.**

**ठराव** After considerable discussion, it was resolved that the item be referred back for want of following information :- T

1. Who has considered to continue his services as Professor ?
2. Why the item was placed in the year 2017 and not earlier ?

3. What was the objective for keeping the item in Management Council so late ?
4. Why University has not recovered the salary amount of seventeen lakhs till now and who has granted permission to work for two years ?

बाब क्र.७ **Regarding Sabbatical Leave to Dr. Anuradha Mishra, Dr. Vibha Surana, Dr. Uttara Sahasrabuddhe and Dr. Premsagar Vivek. Decision for granting Sabbatical Leave to University teachers.**

ठराव It was resolved that sabbatical leave cannot be granted to the University teachers taking into consideration of the Higher and Technical Education Department letter No. Sankirna-2017/Pr.k.184/17/vishi-1 dated 13th December 2017.

बाब क्र.८ **Permission to accept donation of Rs.2 Crore to create an endowment Chair alongwith administrative assistance in Chanakya International Institute of Leadership Studies.**

ठराव It was resolved that, the permission to accept donation of Rs.2 Crore to create an endowment chair alongwith administrative assistance in Chanakya International Institute of Leadership Studies be referred back for want of detailed information, such as who is doner, what activity will be conducted etc.

बाब क्र.९ **मुंबई विद्यापीठ व भाभा परमाणू अणुसंधान केंद्र भारत सरकार यांच्यातील ५ वर्षाच्या विद्यावाचस्पती (Ph.D Collaborative Programme) सहकार्यातील कराराची मुदत वाढविण्याबाबत सचिव, भाभा परमाणू अणुसंधान केंद्र, मुंबई यांच्याकडून आलेला प्रस्ताव.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठ व भाभा परमाणू अणुसंधान केंद्र भारत सरकार यांच्यातील ५ वर्षाच्या विद्यावाचस्पती (Ph.D Collaborative Programme) सहकार्यातील कराराची मुदत वाढविण्याबाबत खालील दुरुस्तीसह मंजूरी देण्यात आली.

"University of Mumbai's name must appear in the publications arising out of the work carried out by the students registered with the University of Mumbai."

तसेच, "प्रबंध विभागाने या कराराच्या अनुषंगाने गेल्या पाच वर्षात किती विद्यार्थ्यांना पीएच.डी. बहाल करण्यात आल्या, याबाबत माहिती द्यावी".

बाब क्र.१० **To constitute a Committee for deciding the terms and conditions of reference as well as Honorarium/Payment etc. to OSD's such as Co-ordinators, Adviser, Professional/Technical**

**experts etc. on Establishment of University of Mumbai.**

ठराव It was resolved and confirmed that, following Committee be constituted to decide the terms and conditions as well as Honorarium/Payment etc. to OSD's Co-ordinators, Adviser, Professional/Technical experts etc. on Establishment of University of Mumbai. :-

1. Shri. Deepakkumar Mukadam (Convener),
2. Dr. Gautam Gawali (Head, Department of Psychology),
3. Dr. Kavita Laghate (I/c. Finance & Accounts Officer)
4. Shri.Nilkanth Talawadekar (Deputy Registrar, Establishment Section),
5. Shri. Datta Ghughe (Deputy Registrar, TAAS)

The Committee should submit the report within a month. Meeting of the Committee is fixed on 12th March, 2018.

**बाब क्र.११ वित्त व लेखा समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त**

ठराव असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

**बाब क्र.१२ विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट न होणा—या शिक्षकेत्तर कर्मचा—यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट न होणा—या शिक्षकेत्तर कर्मचा—यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुन:श्च सादर करण्यात यावा.

**बाब क्र.१३ मुंबई विद्यापीठाचे सन २०१३—२०१४ चे वर्षवृत्त विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाचा सन २०१३—२०१४ (१ एप्रिल, २०१३ ते ३१ मार्च, २०१४) चा वार्षिक अहवाल स्विकारण्यात यावा व अधिसभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाचा सन २०१३—२०१४ चा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी प्राचार्य डॉ. मुरलीधर कु—हाडे, प्रभारी अधिष्ठाता, मानव्यविज्ञान विद्याशाखा यांना नामनिर्देशित करण्यात आले.

**<u>चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.</u>**

(१) पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे परिक्षा शुल्क रुपये ६५०/— पासून रुपये १५००/— पर्यंत वाढविण्यात आले; परंतु, परिपत्रक क्रमांक युजी/२५३/२०१७, दिनांक ७ मार्च, २०१७ अन्वये रुपये १५००/— परिक्षा शुल्क निश्चित केले असताना त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी न झाल्याने अनेक विभाग प्रमुखांनी रुपये ६५०/— ते रु. १०००/— पर्यंत विविध प्रकारचे परिक्षा शुल्क आकारल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांनी ~~वेगवेगळ्या~~ परिक्षा शुल्कांची विविध प्रकारे आकारणी केली. (रु. ६५०/— ते रु. १०००/—) यामध्ये कुठलीही समानता नसल्याचे स्पष्ट होते. अनेक विद्यार्थी संघटनांनी वाढीव शुल्काबद्दल आंदोलन केल्याने विद्यापीठाने विविध प्राधिकरणासमोर बाब ठेवून शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला व तसे आदेश परिपत्रक क्र. Exam/Fees/15/2018, दिनांक ३१ जानेवारी, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आले. पदव्युत्तर परिक्षेकरिता आकारण्यात येणारे परिक्षा शुल्क रुपये ६५०/— ते रुपये १५००/— पर्यंत वाढविण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर परिपत्रक क्र. Exam/Fees/15/2018, दिनांक ३१ जानेवारी, २०१८ अन्वये रुपये १३५०/— शुल्क निश्चित करण्यात आले व त्यास स्थगिती देण्यात आली व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता अध्यादेश O.२१६ प्रमाणे परिक्षा शुल्क लागू करुन परिस्थिती जैसे थे ठेवण्याचा निणर्य घेण्यात आला.

यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ च्या तरतुदीनुसार शुल्क समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले. तसेच, परिक्षा विभागाने निर्गमित केलेल्या परित्रिकानुसार विविध विभागांनी परिक्षेसाठी वेगवेगळी रक्कम आकारल्याचे निर्दशनास आल्याने परिक्षा विभागाने सर्व विभागाकडून अहवाल मागवून एकत्रित अहवाल व्यवस्थापन परिषेदत सादर करावा.

(२) श्री. विजय तायडे (वित्त व लेखा अधिकारी) दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झाले. त्यांची सेवा विद्यापीठास लाभली व त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले, व त्यांना अभिनंदनाचे पत्र देण्यात यावे, असे ठरले.

(३) विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा—यांना प्रशिक्षण देणे संदर्भात विद्याविषयक व प्रशासकीय प्रशिक्षण केंद्र येथे सर्वप्रथम उपकुलसचिव व सहायक कुलसचिव यांना प्रशिक्षण देण्यात यावे व त्यानंतर सर्वच स्तरावरील कर्मचा—यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे ठरले. तसेच, विद्यापीठात शंकरराव चव्हाण शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीत प्रशिक्षणाचे—

कामकाज तातडीने सुरु करण्यात यावे, असे ठरले.

(४) अर्थसंकल्पीय बाबींवर चर्चा करताना असे ठरले की, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या अधिपत्याखाली मंत्री महोदयांची भेट घेवून विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(५) आयकर विभागाने विद्यापीठास Assesment Order U/s143/(3) & 2.72 (A) 2 (a) अनुसार वर्ष २००६-०७ ते २०११-१२ या वर्षांचे उत्पन्न करपात्र ठरवून यासाठी रुपये ४७.४९/– कोटी इतकी रक्कम दंड म्हणून भरण्याची नोटीस दिल्याबद्दल कुलसचिवांनी सभागृहात माहिती दिली. मिळालेल्या नोटीस बाबत विद्यापीठाने आयकर (सूट) कार्यालयात अपील दाखल केलेले आहे व त्याचा निकाल (ट्रिबूनल) प्रलंबित आहे. दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी कुलसचिव तसेच वित्त व लेखा अधिकारी यांनी चार्टर्ड अकाऊटंट सह आयकर आयुक्त यांची पिरॅमल चेंबर येथील कार्यालयात भेट घेवून विनंती केली. वित्त व लेखा अधिकारी यांनी याबाबत सभागृहास सखोल माहिती दिली सदर बाब आयकर विभागाच्या कार्यालयात प्रलंबित आहे. निकाल लागेपर्यंत एकूण दंडाच्या २१ टक्के रक्कम भरणे अपेक्षित आहे. तथापि विद्यापीठाची आर्थिक स्थिती बघता रुपये २ कोटी हे दिनांक १०.०३.२०१८ रोजी (रुपये १ कोटी) व दिनांक २८.०३.२०१८ रोजी (रुपये १ कोटी) भरण्याची परवाणगी देण्यात आली आहे.

(६) विद्यापीठाच्या सर्व प्रशासकिय व शैक्षणिक विभागाच्या आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय व परिक्षे विषयी समस्या/अडचणींचा व्यवस्थापन परिषदेने आढावा घेउन त्या निवारण्यासाठी कार्यपध्दती विकसित करावी, असे ठरले, व त्यासाठी समिती गठीत करण्यात यावी व समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

SKSawant 20/03/18

सहायक कुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू 22/3/18

कुलगुरू 18